# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नांदेड |
| 2 | पोलीस स्टेशन | पो.स्टे शिवाजीनगर जि.नांदेड |
| 3 | गुरनं व कलम | गु.र.नं. ५४/२०२६ कलम. ७ भ्र.प्र.अ. १९८८ |
| 4 | तक्रारदार | पुरुष, वय ३८ वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | श्री. संतोष नागोराव बोयाळ, वय ३८ वर्षे, वरिष्ठ तंत्रज्ञ (गट क), महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शाखा लिंबगाव, ता.जि.नांदेड, रा.नाईक नगर, नांदेड |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक ११.०२.२०२६ चे १६.४१ ते १७.५७ वाजताचे दरम्याण व्हि. आय.पी रोड नांदेड येथे |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक १२.०२.२०२६ चे ०१.०३ वाजता स्टे.डा.नोंद नं ०५ वर |
| 8 | मागणी केलेली रक्कम | ३०००/— रुपये |
| 9 | स्विकारलेली रक्कम | २०००/— रुपये |
| 10 | **थोडक्यात माहिती** – दि. १०/०२/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, त्यांचे वडिलांचे नावे वानेगाव, ता. जि. नांदेड येथील शेत शिवारामध्ये शेती आहे. त्या शेतीमध्ये मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेअंतर्गत त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे दिनांक ३०/०९/२०२५ रोजी सी.एस.सी.केंद्र वाघी, ता.जि.नांदेड येथून ऑनलाईन अर्ज केला होता. त्याप्रमाणे शासनाने निर्धारित केलेली ऑनलाइन शुल्क त्यांनी भरणा केली होती.<br>त्यानंतर दिनांक ०४/०२/२०२६ रोजी महावितरण कंपनीकडून लिंबगाव सर्कलचे लाईनमन श्री संतोष बोयाळ हे ऑनलाइन सर्वे करण्यासाठी तक्रारदारांचे शेतात आले होते. त्यावेळी लाईनमन संतोष बोयाळ यांनी तक्रारदार यांना सांगितले की, सर्वे करून रिपोर्ट सबमिट करण्यासाठी इतर लाभार्थ्या कडून ३०००/– रुपये घेत असतो, तुला पण द्यावे लागतील. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना सर्वेची फीस आहे का, असे म्हणून विचारणा केली. त्यावेळी लाईनमन संतोष बोयाळ यांनी सर्वेची फीस नाही असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी सध्या माझ्याकडे पैसे नाहीत, नंतर देतो माझा सर्वे रिपोर्ट सबमिट करा असे सांगितले. तेव्हा लाईनमन संतोष बोयाळ यांनी त्यांचा सर्वे रिपोर्ट त्यांचे कार्यालयास ऑनलाईन सबमिट केला. त्यानंतर दि. ०४/०२/२०२६, दि ०५/०२/२०२६ व दि. ०६/०२/२०२६ रोजी लाईनमन संतोष बोयाळ यांनी तक्रारदार यांचे मोबाईलवर फोन करून तुझे काम केलेले आहे, तरी तू आतापर्यंत मला पैसे दिले नाहीत, असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी पुन्हा किती पैसे द्यावे लागतील अशी विचारणा केली असता, लाईनमन संतोष बोयाळ त्यांनी ३०००/– रुपये दे असे म्हणून लाचेची मागणी करीत असले बाबत तक्रार दिली.<br>दि. ११/०२/२०२६ रोजी तक्रारदार व लोकसेवक लाईनमन संतोष बोयाळ यांची भेट घेण्यासाठी शासकीय पंचा समक्ष लोकसेवक यांना त्यांचे मोबाईलवर कॉल करून विचारले, तेव्हा लोकसेवक यांनी तक्रारदार यांना आनंदनगर चौक, नांदेड येथे बोलाविले. तक्रारदार यांनी शासकीय पंचा समक्ष लोकसेवक यांची आनंद नगर नांदेड येथे भेट घेतली. त्यावेळी लोकसेवक लाईनमन संतोष बोयाळ यांनी मी ३०००/– रुपये घेतो, तुला काय द्यायचे तू दे, असे म्हणून लाच मागणी केली. तक्रारदार यांनी २०००/– रुपये देऊ का असे म्हणाले असता लोकसेवक लाईनमन बोयाळ यांनी तुझ्या मनाने दे असे म्हणून तडजोडीअंती स्वतः साठी २०००/– रुपये लाच स्वीकारण्यास संमती दिली.<br>दि. ११/०२/२०२६ रोजी लाचेची मागणी केल्यानंतर, परत तक्रारदार यांना लोकसेवक लाईनमन संतोष बोयाळ यांनी मोबाईल वर कॉल करून माधव दाल मिल, नवीन मोंढ्याजवळ येण्यास सांगितले. तक्रारदार यांना शासकीय पंचासोबत २०००/– रुपये लाचेच्या रकमेसह तेथे पाठविले असता, आयटीआय ते अण्णाभाऊ साठे चौक जाणारे रोडवरील गजानन पान शॉप समोर लोकसेवक वरिष्ठ तंत्रज्ञ संतोष बोयाळ यांनी तक्रारदार यांचे कडून तक्रारदाराचे सौर कृषी पंपाचा सर्वे करून ऑनलाईन रिपोर्ट सबमिट केल्याचा मोबदला म्हणून २०००/– रुपये स्वतः लाच स्वीकारताना रंगेहाथ मिळून आले आहेत. म्हणुन पोस्टे शिवाजीनगर नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. | |

सदरची सापळा कारवाई मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेड चे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार, पोलीस निरीक्षक श्रीमती माधुरी यावलीकर व नांदेड युनिट पथक यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

**१) संदीप पालवे, पोलीस अधीक्षक** – ०२४६२ – २५५८११, मो.नं. ९२२६४८४६९९
**२) श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक** – ०२४६२ – २५५८११
**३) श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक** – मो.नं. ९३५९०५६८४०.

| | |
|---|---|
| ४) टोल फ्रि | – १०६४ |
| ५) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी क्रमांक | – ०२४६२ – २५३५१२ |
| ६) Website | – www.acbmaharashtra.gov.in |
| ७) Mobile App | – www.acbmaharashtra.net |
| ८) Facebook Page | – www.facebook.com/maharashtraACB |
| ९) Twitter | – @ACBnanded |
| १०) Instagram | – acb_nanded |
| ११) Youtube Cahnnel | – @AntiCorruptionBureauNanded |
| १२) whats App number | – ८९५६५०१०६४ |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड